# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५/ चैत्र ३, १९४६ शके

**४७.** बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ हा दिवस विधानसभा "उपाध्यक्ष" पदाच्या निवडणूकीसाठी निश्चित केला आहे. निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्र मंगळवार, दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई यांच्याकडे दुपारी १२.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रितीने पाठविण्यात यावे.

नामनिर्देशनपत्रांची छाननी मंगळवार, दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी सचिव (१) (कार्यभार), महाराष्ट्र विधानसभा यांच्या दालनात दुपारी १२.०० वाजता होईल.

त्यानुसार ज्यांना उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी सचिव (१) (कार्यभार) यांच्याकडे दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्वत: उमेदवाराने, सूचकाने किंवा अनुमोदकाने आणून देणे आवश्यक आहे.

उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम, नामनिर्देशनपत्र आणि उमेदवारी मागे घेण्याच्या सूचनेच्या प्रती सचिव (१) (कार्यभार) यांच्या कार्यालयात तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या "अ" कक्षात (अकरावा मजला, कक्ष क्र.११०३) उपलब्ध आहेत. उपरोक्त निवडणूकीचा कार्यक्रम आवश्यक त्या कागदपत्रांसह या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

याबाबत सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी सभागृहात घोषणा करण्यात आली आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २४ मार्च, २०२५.**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (Website)